**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.७९६/२०२५ मधील निशाणी क्र.०१ वरील आदेश**

रोहीदास व इतर वि. निरंक

(आदेश पारीत दिनांक – ०८.०४.२०२६)

CNR No.MHLA060038652025

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियम,१८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जदारांचे संक्षिप्त कथन असे की, नामे विठ्ठल पि. श्रावण काळे यांचा दिनांक २५.०८.२०१९ रोजी मौजे शेलदरा, ता.जळकोट, जि.लातूर, येथे वृध्दापकाळामुळे मृत्यू झाला आहे. (तद्नंतर 'विठ्ठल पि. श्रावण काळे' यांना वाक्यांची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने 'मयत विठ्ठल' असे संबोधण्यात येईल). मयत विठ्ठल यांचे समयीचे कायदेशीर वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | नांव | मयताशी नातेसंबंध |
|---|---|---|
| १. | रोहीदास पि. विठ्ठल काळे | मुलगा |
| २. | देविदास पि. विठ्ठल काळे | मुलगा |
| ३. | प्रल्हाद पि. विठ्ठल काळे | मुलगा |
| ४. | रामकिशन पि. विठ्ठल काळे | मुलगा |
| ५. | सुदामती भ्र. विलास मस्के | मुलगी |
| ६. | अनिता पि. धोंडीराम सोमोसे (वडिलाकडील नाव)<br>अनिता भ्र गोरख काळे (पतीकडील नाव) | सुन |
| ७. | संदेश पि. गोरख काळे | नातू |
| ८. | प्रतिक्षा पि. गोरख काळे | नात |
| ९. | दिक्षा भ्र. दत्ता कांबळे | नात |

०३. अर्जदारांचे कथन असे की, वरील वारसदारां व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदाराने मयताच्या मृत्यू पश्चात त्यांच्या नांवे असलेल्या स्थावर व जंगम मालमत्ता मयताचे कायदेशीर वारसदारांच्या नावे हस्तांतरण करणेकामी व इतरही शासकीय आणि

निमशासकीय कार्यालयीन कामकाजासाठी प्रस्तुतचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केला आहे.

०४. दि बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे नियम १ चे तरतुदीनुसार न्यायालयाचे मान्यतेने मयत व्यक्तीचे कायदेशीर वारस हे सक्षमपणे प्रतिनिधीत्व करु शकतात. नियम २ चे तरतुदीनुसार न्यायालयाने वारस, मृत्युपत्र व्यवस्थापक किंवा प्रशासक यांना त्यांचे हक्क मान्य करण्यासाठी त्यांनी दाखल केलेल्या अर्जावरुन जाहीर प्रगटनानंतर एक महिन्यांचे आत अर्जदाराचे हक्काबाबत आक्षेप घेण्यासाठी त्यांचे आक्षेप नोंदविणे गरजेचे असते. नियम ७ चा दुसरा भाग हा असे विदित करतो की, सदरचे प्रमाणपत्र हे कोणत्याही मिळकतीवरील हक्क निश्चित करीत नसुन, ते फक्त सद्य परिस्थितीवरील कायदेशीर व्यवस्था व्यक्तीचे वारसासाठी दर्शविते. तसेच अशाप्रकारे मंजूर केलेले प्रमाणपत्र अंतिमत: हक्क निर्णित करीत नाही किंवा इतरांचे हक्कास इजा/हानी पोहोचवित नाही.

०५. अर्ज दाखल झाल्यानंतर दिवाणी न्यायालय क.स्तर, तहसिल कार्यालय व पंचायत समिती कार्यालय व ग्राम पंचायत कार्यालय, शेलदरा, ता.जळकोट यांचे नोटीस बोर्डवर जाहिरनामा (निशाणी क्र.७) प्रसिध्द करण्यात आला. अर्जदारांच्या विनंतीस कोणाचा आक्षेप आहे काय ? याबाबत न्यायालयाच्या आदेशान्वये अर्जदाराने दिनांक ०७.०१.२०२६ रोजी ''दैनिक राजधर्म'' वृत्तपत्रामध्ये जाहिर प्रगटन (निशाणी १३) प्रसिध्द करण्यात आले. परंतु आजतागायत सदर प्रकरणामध्ये कोणाचाही आक्षेप/उजर प्राप्त झाला नाही.

०६. प्रस्तुत अर्जातील कथनांच्या पुष्ठयर्थ अर्जदाराने (निशाणी १०) अन्वये रोहीदास पि. विठ्ठल काळे यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले. तसेच अर्जदाराने त्यांच्या स्वत:च्या आधार कार्डची सत्यप्रत दाखल केलेली आहे. सदर प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्याने त्याच्या प्रतिज्ञापत्रात अर्जातील कथनांचा तंतोतंत समावेश केला आहे. कथनांची पुनरावृत्ती टाळण्याच्या हेतूने त्याच्या प्रतिज्ञापत्रातील कथने याठिकाणी मांडण्याची आवश्यकता नाही. शिवाय अर्जदाराने ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शेलदरा, ता.जळकोट, जि.लातूर यांनी निर्गमित केलेले मयताचे मृत्यू प्रमाणपत्र (निशाणी १४) व सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, शेलदरा, ता.जळकोट, जि.लातूर यांनी निर्गमित केलेले वारसाचे प्रमाणपत्र (निशाणी १२) वर दाखल केले आहेत. सदर मृत्यूपत्राचे अवलोकन केले असता, त्यामध्ये मयत विठ्ठल यांचा दिनांक २५.०८.२०१९ रोजी शेलदरा, ता.जळकोट, जि.लातूर येथे मृत्यु झाल्याचे दिसून येते. तसेच वारसाचे प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, त्यामध्ये अर्जदार व वरील नमूद

वारस हे मयत विठ्ठल यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. अर्जदार व वारस यांनी (निशाणी क्र.११ ते ११/८) कडे त्यांचे आधारकार्ड ओळखपत्राच्या पडताळलेल्या प्रती दाखल केली. तद्नंतर अर्जदाराने (निशाणी १५) अन्वये पुरसिस सादर करुन त्याचा पुरावा बंद केला.

०७. अर्जदाराच्या पुराव्यास कोणीही आव्हान दिलेले नाही. त्यामुळे अर्जातील कथनावर विश्वास ठेवण्यास हरकत नाही. अभिलेखाचे अवलोकन करता तसेच अद्याप कोणाचा आक्षेप नसल्यामुळे मयत यास अर्जदार व वरील नमूद वारस हे मयत विठ्ठल यांचे कायदेशीर वारस असल्याचे ग्राहय धरण्यास हरकत नाही. उपरोक्त विश्लेषणाअंती अर्जदार याचे मयताशी असलेले नातेसंबंध विचारात घेता अर्जदार व वरील नमूद वारस हे मयत विठ्ठल यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येते.

२. अर्जदार व वरील नमूद वारस नामे ०१. रोहिदास पि. विठ्ठल काळे, ०२.देविदास पि. विठ्ठल काळे, ०३. प्रल्हाद पि. विठ्ठल काळे व ०४.रामकिशन पि. विठ्ठल काळे सर्व रा. शेलदरा, ता.जळकोट, जि.लातूर व ०५. सुदामती भ्र. विलास मस्के रा.बेलगाव, ता.चाकूर, जि.लातूर, ०६.अनिता पि. धोंडीराम सोमोसे व अनिता भ्र गोरख काळे, ०७. संदेश पि. गोरख काळे व ०८. प्रतिक्षा पि. गोरख काळे सर्व रा. शेलदरा, ता.जळकोट, जि.लातूर हा.मु. उदगीर ता.उदगीर, जि. लातूर व ०९. दिक्षा भ्र. दत्ता कांबळे रा. तळेगाव भोगेश्वर, ता.देवणी, जि.लातूर हे मयत विठ्ठल पि. श्रावण काळे रा.शेलदरा, ता.जळकोट, जि.लातूर यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करण्यात येते व सदरचा वारसा दाखला हा अर्जदारास देण्यात येते.

३. दिवाणी पुस्तिका प्रकरण क्र.१४ मधील परिच्छेद क्रमांक ३१२ अन्वये मूळ वारस प्रमाणपत्रावर टिप नमूद करावी.

४. अर्जदाराने आवश्यक ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमित करावे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहिर).

Digitally signed by MEGHA CHANDRAKANT HASGE
Date: 2026.04.08 16:11:59 +0530

स्थळ :- अहमदपूर.
दिनांक :- ०८.०४.२०२६.

(एम.सी. हासगे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
अहमदपूर.